# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पुर्व), मुंबई -५१.
दुरध्वनि क्र .:- २६४००७६४ फॅक्स क्र.:-६५५६८०५ईमेल आयडी :-collectormngmsd@gmail.com

क्र.अ.जि./डेस्क-४/गौखनि/कावि-११६२ /२०१८-१९
दि. 06 /०८/२०१८.
जा.क्र-55

प्रति,
श्री अवधूत राणे, जनरल मॅनेजर,
महाराष्ट्र चेंबर्स ऑफ हौसिंग इंडस्ट्रीज'

**विषय:-** गौण खनिज उत्खनन व स्वामित्वधन शुल्क प्रक्रिया सुलभीकरण..
**संदर्भ:-** मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे दिनांक २३/०७/२०१८रोजी झालेल्या 'महाराष्ट्र चेंबर्स ऑफ हौसिंग इंडस्ट्रीज' चे पदाधिकारी यांचे बैठकीतील गौण खनिज उत्खनन बाबत.

मुंबई गौण खनिज उत्खनन नियम १९५५ मधील नियम ४ नुसार शासकीय मालकीच्या जमीनीतून व नियम २२-अ नुसार खाजगी व्यक्तींच्या मालकीच्या जमिनीतून गौण खनिज उत्खनन करण्यास सक्षम अधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये खाण परवाने/ भाडेपट्टे दिलेले नसून या जिल्ह्यातील गौण खनिजाची वसूली प्रामुख्याने नव्याने बांधल्या जाणा-या किंवा पुर्नविकास होणा-या इमारतींसाठी करण्यात येणा-या खोदकामातून व भरावातून होते. मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीए, म्हाडा, एसआरए, एम.आय.डी.सी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ अशी विविध नियोजन प्राधिकरणे असून त्यांचेमार्फत निवासी औद्योगिक व वाणिज्य प्रयोजनाच्या बांधकाम परवानग्या दिल्या जातात त्याअन्वये प्राप्त होणा-या अर्जानुसार या कार्यालयामार्फत गौण खनिज उत्खनन परवाना आदेश निर्गत होतात.

संदर्भिय विषयान्वये या कार्यालयात झालेल्या बैठकीमध्ये गौण खनिज स्वामित्वधन शुल्क सुलभीकरणाच्या प्रक्रियेबाबत चर्चा झालेली असून त्याअनुषंगाने गौण खनिज स्वामित्वधनाबाबत शासकीय शुल्काचे नुकसान होऊ नये व विकासक, नियोजन प्राधिकरणांच्या परवानगी अर्जांचा जलद गतीने निपटारा होण्यासाठी गौण खनिज स्वामित्वधन शुल्क भरणेबाबत पुढीलप्रमाणे प्रक्रिया निश्चित केली आहे.

## गौण खनिज स्वामित्वधन शासन जमा करण्याबाबतचे सुलभीकरण-

१) बांधकाम विकासकामांना संबंधित नियोजन प्राधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयास अर्ज करावे लागतात व त्यामध्ये कालापव्यय होण्याची शक्यता असल्याने सदर कार्यपध्दीमध्ये सुलभता आणणेसाठी कार्यपध्दती प्रस्तावित करणेत येत आहे.

२) नियोजन प्राधिकरणाने बांधकाम परवानगी (IOD, CC, LOI) देताना गौण खनिजाचे परिमाण निश्चित करावे व अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देताना स्वामित्वधन (Royalty) भरलेची खात्री करावी.

३) विकासक/बांधकाम व्यावसायिक/कंत्राटदाराने नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे इमारत पायाचे लांबीXरूंदीX उंची याप्रमाणे अनुज्ञेय होणारे गौण खनिज परिमाण विचारात घेऊन त्यापेक्षा १०% अधिक परिमाण गृहित धरून प्रचलित स्वामित्वशुल्क दराने एकूण स्वामित्वशुल्क व भूपृष्ठभाडे ग्रास प्रणालीद्वारे https://gras.mahakosh.gov.in या संकेतस्थळावरती जावून **pay without registration** या ऑप्शन वर क्लिक करून त्यानंतर येणाऱ्या स्क्रीनवर खालिल नमुद माहिती भरावी.

| | |
|---|---|
| **Department Name** | **Revenue Department** |
| **Payment Type** | **mineral Concession Fees, Rates And Royaltise** |
| **District** | **Mumbai** |
| **Office Name** | **Addl. Coll. Mum. Suburban** |
| **Scheme Name** | **Receipts From The Minor Mineral Extraction Rules** |
| **Period** | **One Time /Adhoc** |
| **Amount** | - |
| **Department tax ID** | CR NO.- /2018-19 |
| **Account Head** | **0853** (004101) |
| **Name** | |
| **Address** | - |
| **Mobile No./Land Line** | - |
| **Payment mode** | **Payment Across Bank Counter /Online** |
| **Select bank** | **Any Other Nationalise Bank** |

१) ग्रास (GRAS) प्रणालीमधील चलान, मंजूर बांधकाम नकाशा, CC Form, प्रॉपर्टी कार्ड, इत्यादी कागदपत्रांसह जिल्हाधिकारी कार्यालयात गौण खनिज उत्खनन परवाना मिळणेसाठी अर्ज करावा.

२) अर्ज प्राप्त होताच उत्खनन परवाना आदेश निर्गमित करण्यात येईल.

३) आवश्यकता असल्यास वाहतूक पास निर्गमित करण्यात येतील.

४) उत्खनन परवानाची मुदत संपल्यानंतर तसेच प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यास स्थळपाहणी करून उत्खनन संदर्भात मोजमापे घेऊन गौण खनिज उत्खनन परवाना दिलेल्या परिमाणाप्रमाणे काम केले आहे अगर कसे याची खातरजमा करण्यात येईल व आवश्यकतेनुसार दंडात्मक आदेश पारित करण्यात येतील.

तरी वरील कार्यपध्दतीचा अवलंब विकासक यांनी करणेबाबत आपलेस्तरावरून प्रसिद्धी देण्यात यावी.

**अपर जिल्हाधिकारी**
**मुंबई उपनगर जिल्हा**

**स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची सही असे**

17902
31/8/18